*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

# Unit 5

# Environmental Ethics

## सुजीवनविषयक विविध दृष्टिकोन

## सत्र दुसरे : विभाग दुसरा :

## उपयोजित नीतिशास्त्र



### घटक 5 : पर्यावरणाची नीतिमीमांसा

1. उपयोजित नीतिमीमांसेचे स्वरुप आणि महत्व.
2. पर्यावरण नीतिमीमांसा : उपयोजित नीतिमीमांसेची एक शाखा.
3. ईश्वरकेंद्रवाद, मानवकेंद्रवाद, जैवकेंद्रवाद, पर्यावरण केंद्रवाद.
4. प्राण्याचे हक्क, शाकाहार वाद, प्राण्यांवरील प्रयोग याबद्दल नैतिक समस्या.
5. शाश्वत विकासाची कल्पना.सखोल पर्यावरणवाद विरुध्द उथळ पर्यावरणवाद.

Department of Philosophy, Sangamner College Sangamner

### प्रस्तावना

जीवनाला थेटपणे भिडणाऱ्या नैतिक समस्या सोडविण्यासाठी नैतिक सिध्दांताचे आणि तत्त्वज्ञानात्मक पध्दतीचे उपयोजन करणारी ही तत्त्वज्ञानाची शाखा आहे.नैतिक सिध्दांत आणि व्यवहार यांची सांगड घालण्याचा प्रयत्न उपयोजित नीतिशास्त्र करते आणि गरज असल्यास नवा सिध्दांत मांडते.नैतिक संकल्पनांचा थेट जीवनाशी संबंध जोडुन मानव,जग,निसर्ग,प्राणी व वनस्पतीसृष्टी यांच्यातील 'जैविक आंतरसंबंधाचा ' (organic interrelationship) शोध घेते, त्यांचा अतिशय प्रेमाने व सहानूभूतीने विचार करते.

ज्या समस्यांची उत्तरे प्रचलित - आदर्शात्मक नीतिशास्त्र अथवा अधिनीतिशास्त्र देण्यास असमर्थ आहे,अशा समस्यांची चर्चा हे नवे नीतिशास्त्र करते.त्यांची केवळ सैध्दांतिक मांडणी न करता उपायही सुचविते. आपल्या जीवनाचे आणि आपण ज्यांच्याबरोबर राहतो त्या माणसांच्या,निसर्ग व प्राणी यांच्याही जगण्यातील तत्काळ महत्वाच्या नैतिक प्रश्नाची ते मांडणी करते.उदा. गर्भपात, आत्महत्या, दयामरण, पर्यावरण प्रदुषण इ.इ. हे सर्व प्रश्न प्रसिध्दी माध्यमातून पुढे येतात. पण त्यांची सखोल व तत्त्वज्ञानात्मक चर्चा केवळ उपयोजित नीतिशास्त्र करते. उपयोजित नीतिशास्त्र ही बौध्दिक घटनाच मुळात युरोपियन,पाश्चात्य आहे. त्यामुळे ती त्या चौकटीत समजावून घेणे आवश्यक आहे.

गेल्या 50 वर्षात तत्त्वज्ञानाच्या इतर कोणत्याही शाखेचा विकास झाला नाही इतका विकास उपयोजित नीतिशास्त्राचा झाला. विशेषत: दुसऱ्या महायुध्दानंतर वरील प्रश्न पाश्चात्यांमध्ये व युरोपमध्ये जास्त उग्र झाले. 20 वे शतक मानवजातीच्या आयुष्यात अतिशय महत्वाचे व भयानक वेगाचे ठरले. अनेक गोष्टींचे संदर्भच बदलले.शहरीकरण,उद्योगधंद्याची वाढ आणि कमाल पातळीवर पोहोचलेल्या परस्परावलंबी जीवनशैलीमुळे संकीर्ण आणि वस्तुनिष्ठ समस्या निर्माण झाल्या.1990 नंतर जागतिकीकरणाच्या लाटेने आणखी नवेच नैतिक प्रश्न निर्माण केले.रासायनिक-आण्विक - जैविक अस्त्रे,संगणकीय यंत्रणा,जीवतंत्रज्ञान,माहिती तंत्रज्ञान,शेती,जंगले,मोठ्या धरणांचे महाप्रकल्प, इत्यादीबाबतची प्रगत देशांची धोरणे,त्या धोरणांचे इतर देशांवर होणारे अतिक्रमण स्वरुपाच्या जास्तच

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---



गुंतांगुतीच्या जटील नैतिक समस्या निर्माण झाल्या. विषमता, अन्याय, आत्महत्या, गर्भपात, स्वेच्छामरण, कामसंबधातील नीती,प्राण्यांचे मुक्त आंदोलन,हे प्रश्न ऐरणीवर आले.या सगळयांचा परिणाम म्हणून व्यक्तिगत व सामाजिक जीवन अत्यंत गुंतागुंतीचे व समस्या प्रधान बनले.या समस्या केवळ शुध्द चारित्र्य,सद्हेतू,सद्सद विवेक,बुध्दिमत्ता,परोपकारवाद इ. आदर्शवादी नैतिक धारणांच्या आधारे सोडविता येणार नाहीत, हे उघडच आहे .

दुसरीकडे घडते असे आहे की, आज प्रत्येक क्षेत्रातील ज्ञान हे ' विशेषज्ञान ' बनत आहे. ज्ञानात विशेषीकरण आले आहे. त्यामुळे एखादया ज्ञानशाखेतील समस्यांची उत्तरे त्याच ज्ञानशाखेतील व्यक्ती देऊ शकते, असे घडत नाही.या समस्या सोडविण्यासाठी त्या - त्या विषयातील तज्ञांचा सल्ला, त्यातील प्रगतशील ज्ञान व परिणाम यांचे ज्ञान आवश्यक आहे, याचे भान आले.तत्त्वचिंतन व इतर ज्ञानशाखा यांच्यात गंभीर आंतरसंवाद सुरु झाला. साहजिकच उपयोजित नीतिशास्त्राला एक व्यापक 'आंतरविद्याशाखीय ज्ञानशाखा ' (Interdisciplinary Discipline) असा स्वतंत्र दर्जा मिळाला.म्हणजेच अर्थ नव्या नैतिक समस्या सोडविण्यात सर्वांनी सहभाग देण्याची चळवळ सुरु झाली. तत्त्ववेत्त्यांच्या विचारकक्षेची पातळी रुंदावली.त्यांचा जनसंपर्क वाढला.

## उपयोजित नीतिशास्त्राचा उदय :

विज्ञानवादी तत्त्ववेत्त्यांच्या मते, जसे प्रत्येक खेळाचे स्वतंत्र नियम असतात तसेच भाषिक खेळांचेही स्वतंत्र नियम असतात. नीतिशास्त्र हा सुध्दा एक भाषिक खेळ आहे. त्यांचे तर्कशास्त्र व नियम वेगळे आहेत. नैतिक विधाने सत्य, योग्य अशी नसली तरी नैतिक विधानांमधून स्विकारण्यासारखे, विचार करण्यासारखे काहीतरी असते.म्हणून तर आपले नैतिक जीवन शक्य होते. त्यासाठी व्यक्तीची वैयक्तिक नीति व व्यावसायिक नीति यात त्यांनी फरक केला गेला.त्यातून उपयोजित नीतीचा उदय झाला.

### वैयक्तिक नीती व व्यावसायिक नीती (Personal Ethics and Proffessional Ethics):

नैतिक जीवनाचा विचार करताना व्यक्तीचे खासगी व व्यावसायिक जीवन यांत फरक केला पाहिजे, याची जाणीव प्रथम ऑर्थर हॅडली Arthur Hadly या तत्त्वज्ञाने त्याच्या 1907 साली लिहीलेल्या 'सार्वजनिक नीतीची पातळी' (*'The Standerds of Public Morality '* ) या ग्रंथात लक्षात आणून दिली. तो अमेरिकन नागरीकांविषयीचे तो निरीक्षण नोंदवितो. ते असे '' अमेरिकन नागरीक'' हा खाजगी जीवनात श्रेष्ठ चारीत्र्याचे दर्शन घडवितो. दुर्बलांशी आदरयुक्त सभ्यता, श्रेष्ठांशी स्वाभिमानी, स्त्रिया व मुले यांच्याशी आदर व नम्रता, मित्रांशी अत्यंत उदार अंतकरणाने, शेजाऱ्यांशी प्रेमाने असे एकूण सर्वांना उपयोगी पडणारा तो 'परोपकारी गंपू ' असतो. तो लबाडी, स्वार्थ, क्षुद्रता करीत नाही. आपत्तीच्या वेळी चांगला मदतनीसही असतो. पण तोच नागरिक सार्वजनिक जीवनात मात्र त्याच मित्राशी,शेजाऱ्याशी व्यापार, नोकरी, राजकारण इ.क्षेत्रात वेगळा वागतो,त्यांना प्रतिस्पर्धी समजून नामशेष करतो. राजकीय उलथा-पालथ किंवा सामाजिक अडचणीच्या वेळी तो व्यावसायिक म्हणून जास्त स्वार्थी असतो. दुर्बलांना टाचेखाली आणतो तर सबलांपुढे लाचारीही पत्करतो. अशारितीने एकाच व्यक्तीचे खासगी आणि सार्वजनिक नीतिमान वेगळे असते.


हॅडलीचे अमेरिकन नागरिकाबाबतचे हे निरीक्षण किती खरे आहे किंवा भारतीय नागरीकांत तशी प्रवृत्ती आढळते का ? हा प्रश्न येथे नाही, तर व्यक्तीच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक वर्तनात एवढी तफावत असते की, तिच्या या दोन अंगाचा विचार स्वतंत्रपणे विचार करण्याची गरज भासते.हा 'नैतिक दुभंगलेपणा' नाही तर त्या बाजूच वेगळ्या असतात.दयाळु , प्रेमळ, करुणामय, विनयशील इ. सद्गुण असलेली व्यक्ती राजकारण, उद्योग, व्यापार, व्यवस्थापन इ. पेशा व व्यवसायासाठी लायक नाहीत, असे समजले जाते ! कारण ही क्षेत्रे स्वार्थी, कपटी, धूर्त,

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

महत्वाकांक्षी, निष्ठूर व्यक्तीसाठीच आहेत, असे मानून सज्जन दुर राहतात. आणि अशा क्षेत्रात यशस्वी ठरणाऱ्याविषयी लोकांचा वाईट ग्रह होतो.

**Arthur Twining Hadley**
(April 23, 1856 – March 6, 1930)
An economist
who served as
President of Yale University
from 1899 to 1921.





या कारणांमुळे नेहमीचे पारंपरिक आदर्शात्मक नीतिशास्त्र व व्यावसायिक नीतिशास्त्र यात फरक करणे आवश्यक बनले.पारंपरिक नीतिशास्त्र व्यक्तीचे खासगी व अतिशय सामान्य स्वरुपाचे सार्वजनिक जीवन नियंत्रित करते. पण सार्वजनिक जीवनाचे स्वरुपच जास्त व्यवसायात्मक झाले आहे. त्यामुळे या दोन प्रकारच्या जीवनात व त्यांच्या नीतित सुध्दा फरक करणे आवश्यक झाले.अशी भूमिका घेण्यात आली .

व्यावसायिक व वैयक्तिक नीतीशास्त्रातील फरकाविषयी दोन मते :

**अ) खुली / सार्वजनिक नीती** **ब) बंदिस्त / विशिष्ट नीती**

## अ) खुली / सार्वजनिक नीती

खुल्या नीतिच्या दृष्टीकोनानुसार कोणतेही नैतिक तत्व सार्वजनिक नसेल, सर्वांसाठी खुले नसेल तर त्याला नैतिक म्हणताच येणार नाही. नीती तीच की जी स्थल,काल व्यक्ती, व्यवसाय, धर्म, लिंग, जात, देश निरपेक्ष असते. त्यामुळे ‘ व्यावसायिक नीती ’ म्हणून असे काहीही असू शकत नाही.

## ब) बंदिस्त / विशिष्ट नीती

विशिष्ट नीति कल्पनेनुसार नीति सार्वजनिक असू शकते.पण सार्वजनिकता हा तिचा निकष नसतो. उलट नीती ही नेहमी बंदीस्त विशिष्ट गटापुरतीच असते.ही नीति उघडच सामाजिक नीतिपेक्षा वैयक्तिक नीतिला प्राधान्य देते. त्यानुसार व्यक्तीचे हक्क, कर्तव्य, सदगुण इ. गोष्टी तिच्या सार्वजनिक भूमिकेवरुन किंवा व्यक्तीगत जीवनात ती नीतिमान आहेत, म्हणून ठरत नाही तर ती विशिष्ट गटाची सदस्य असते म्हणून तिचे सदगुण ठरतात . उदा. विशिष्ट कामगार संघटनेचा कार्यकर्ता म्हणून एखादा कामगार केवळ त्या संबंधित कामगार संघटनेच्या सदस्यांच्या हक्क व हिताशीच निगडीत असतो. त्याचा एकूण मानवजातीचे हक्क किंवा जगातील कामगारांचे हक्क यांच्याशी संबंध नाही. दलित चळवळीच्या कार्यकर्त्यांची जबाबदारी मानवी समाजात न्यायाची प्रस्थापना करणे ही नसून केवळ दलितांना न्याय मिळवून देण्याची आहे. कारखान्याच्या संचालकाने कारखान्याची भरभराट कशी व्हावी, हे पाहावे राष्ट्रीय उत्पन्नाची काळजी करु नये, असे बंदीस्त नीती सांगते.

अशा रितीने एखादया व्यक्तीची नैतिकता किंवा तिची नैतिक पातळी मानवी हक्क , सदगुण, कर्तव्य बुध्दि इत्यादी निकषांमुळे ठरत नाही तर तिचे कुटुंब, तिचा व्यवसाय, तिचा गट व त्यातील तिचे हक्क, कर्तव्य, जबाबदाऱ्या या व्यक्तिगत निकषांतूनच ठरतात, हे लक्षात ठेवणे महत्वाचे. म्हणजेच स्थल काल व्यवसाय विशिष्ट किंवा सापेक्ष असे नीतीचे स्वरुप ठरते.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

कोणतीही व्यवसाय असाच एखादा गटाच्या रुपात काम करीत असतो.त्या त्या गटाची स्वतंत्र नीती विकसित होणे आवश्यक असते.अशा नीतिलाच ' व्यावसायिक नीति ' म्हणावे.हाच विचार व्यापक उपयोजित नीतीचा विचार बनला.उयोजित नीती ही संकल्पना खुली नीती विरुध्द बंदिस्त नीती अशा संघर्षातून उदयास आली व त्यातून विविध प्रकारची व्यावसायिक नीतिशास्त्रे निर्माण झाली.प्राथमिक अवस्थेत मुख्यत: तीन नीतिशास्त्रे सिध्द झाली. ती अशी :

**(1) जैववैद्यकीय नीतिशास्त्र** Biomedical Ethics
**(2) व्यावसायिक नीतिशास्त्र** Professional Ethics
**(3) पर्यावरण नीतिशास्त्र** Environmental Ethics



कालांतराने माध्यमे, व्यवस्थापन, धंदा, व्यवसाय, अभियांत्रिकी, संगणक, समाजकारण, राजकारण, शिक्षक,नोकर,लैंगिक संबंध,कुटुंब आणि विवाहसंबध - नातेसंबंध ,लष्कर, पोलिस इत्यादी प्रकारची स्वतंत्र नीतिशास्त्रे विकसित झाली.या सगळ्यांना मिळून 'उपयोजित नीतिशास्त्रे ' *Applied Ethics* असे नाव मिळाले. नीतिशास्त्र *Ethics* हा सिध्दान्त असून नैतिक वर्तन हे नीतिशास्त्राचे उपयोजन आहे Application आहे , अशी मांडणी करण्यात आली. ही मांडणी 'विज्ञान हा सिध्दान्त आणि तंत्रज्ञान हे उपयोजन ' या समीकरणाशी जुळविण्यात आली.पण ही सर्वांनी मान्य केली आहे, असे मात्र नाही.काही वेगळ्या रितीनेही मांडणी करण्यात आली आहे.

अर्थात, उपयोजित नीतिशास्त्रातील ही सगळी तात्विक घडामोड म्हणजे अगदी अलीकडची बाब आहे, असे समजणे चुकीचे आहे. कारण आपल्या आधीच्या अनेक तत्वज्ञांनी त्यांच्या लेखणातून व्यावहारीक नैतिक प्रश्न उपस्थित केलेले होते. उदा. ॲरिस्टॉटलच्या मते नीतिशास्त्र ही गोष्ट मुळातच शुध्द एक व्यावहारिक उद्योग आहे. ते व्यावहारिकदृष्ट्या उपयोगाचेच शास्त्र आहे., हे त्याच्या सार्वजनिक जीवनातील मैत्रीचे नीतिशास्त्र, मृत्यू आणि न्याय यांच्या चर्चेतुन आढळते.मध्ययुगातील सेंट थॉमस ॲक्विनास या तत्त्वज्ञाने युध्द आणि लैंगिक संबंध व कामुकता या विषयावर मोठे-मोठे निबंध लिहीले. थॉमस हॉब्ज या तत्त्वज्ञाने राष्ट्रनिष्ठा, सैनिकी जीवन व त्याच्या उपयुक्तता आणि मानवता या समस्यांची चर्चा केली तर डेव्हीड ह्यूम, कांट आणि वाल्टेअर यांनी आत्महत्या, कैदयाला दिली जाणारी शिक्षा, फाशी, जागतिक शांतता या समस्यांची चर्चा केली. 18 व्या शतकाच्या उत्तरार्धात जेरेमी बेथॅम या उपयुक्ततावादी तत्त्वज्ञाने फाशीच्या शिक्षेची चिकीत्सा केली. तर 19 व्या शतकात जे. एस.मिल्ल या तत्त्वज्ञाने त्याचा उदारमतवाद आणि स्वातंत्र्य यांचा उपयोग स्त्री पुरुष समता व स्त्रीमुक्तीसाठी केला.बट्रांड रसेल, विट्गेन्स्टाईन, कार्ल पॉपर या तत्त्वज्ञांनी मैत्री, विवाह, लैंगिक स्वातंत्र्य, जागतिक शांतता, युध्दविरोध यांच्या तत्त्वज्ञानात्मक मांडणीवर केवल भरच दिला असे नव्हे तर तुरुंगवासही भोगला.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

## महत्व

उपयोजित नीतिशास्त्र ज्या परिस्थितीतून उद्भवले ती परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची, आव्हानात्मक होती. तिने जगण्याचे अनेक पैलू नव्याने समोर आणले. किंवा नवेच पैलू निर्माण केले. नीतीच्या विश्वाच्या केंद्रबिंदूवरील माणसाचा ज्नमजात हक्क संपुष्टात आला आणि नीती अनेककेंद्री बनली,मानवासह प्राणी,निसर्ग,सारे विश्वच केंद्रस्थानी आले.नैतिकतेची कल्पनाच अमुलाग्र बदलली. ती पारंपरिक नीतिशास्त्राला छेद देणारी,त्याच्या मर्यादा स्पष्ट करणारी होती . साहजिकच नीतीचे मानदंड बदलले.विशेषत: दोन महायुध्दांनी जगाचाच नकाशा बदलला असे नव्हे तर तत्त्वचिंतनाचाही नकाशा आणि कार्यक्रमपत्रिका बदलली !

हे नीतीशास्त्र आपण का स्वीकारावे ?

तर आधुनिक जगात विविध प्रकारचे तणाव आहेत, नवी जाग येते आहे.जगाची सार्वभौमता लक्षात येत आहे. चारित्र्याचे नवे मानदंड शोधणे भाग आहे.जुन्या मूल्यांचा अपुरेपणा,दुर्बलता जाणून नव्या मूल्यांची प्रस्थापना केला पाहिजे.सहकार्य,सहनशीलता,मनाचा खुलेपणा,विश्वासार्हता आणि जबाबदारी स्वीकारण्याचे नवे भान अशी मूल्ये प्रत्येक क्षेत्रात प्रत्येक व्यक्ती व संस्थांनी,संघटनांनी विकसित करणे आवश्यक बनले आहे.तेच त्याचे महत्व आहे.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

# पर्यावरणाचे नीतिशास्त्र

पर्यावरणाचा विचार 20 व्या शतकाच्या प्रारंभीच सुरु झाला होता. त्याला वेग आला तो 1960. नंतर जीव नीतिशास्त्र आणि पर्यावरणीय नीतिशास्त्र या दोन्हींचा विचार 1960 च्या दशकात गांभीर्याने सुरु झाला ही दोन्ही क्षेत्रे परस्परांशी निगडीत होती. पर्यावरण नीतिशास्त्र मुख्यत: या निसर्गाशी, पृथ्वीशी आणि विश्वाशी असलेल्या आपल्या संबंधाच्या कथेची आणि मूल्यात्मकतेची चर्चा करते. संक्षेपात मानव आणि निसर्ग यांचा नैतिक संबंध काय आहे, असा प्रश्न पर्यावरण नीतिशास्त्र विचारते.



मानव आणि निसर्ग संबंध तत्वज्ञानात फार प्राचीन काळापासून चर्चिला गेला आहे. तत्त्वज्ञान मुख्यत: 4 प्रकारच्या संबंधाचा विचार करते.खरे तर त्यातूनच विविध प्रकारच्या निसर्ग-विज्ञानांचा,समाज विज्ञानाचा,मूल्य-विज्ञानाचा आणि ज्यास अध्यात्मशास्त्र (Metaphysics) म्हणतात त्याचा जन्म होतो.हे संबंध असे:

1. मानव आणि विश्व (निसर्ग The Nature + ब्रह्मांड The Universe) = निसर्ग विज्ञाने
2. मानव आणि मानव = सामाजिक विज्ञाने
3. मानव आणि ईश्वर = धर्मशास्त्रे, धर्मतत्त्वज्ञाने
4. स्वत: = अध्यात्मशास्त्रे , तत्त्वज्ञान

पर्यावरण नीति पहिल्या संबंधाशी थेटपणे आणि दुसऱ्या संबंधाशी व चौथ्या संबंधाशी अप्रत्यक्षपणे नाते सांगते. चौथ्या संबंध हा कोणत्याही प्रकारच्या नीतिशास्त्राचा मूळ प्रश्न असतो. मी कोण ? माझा कोणाशी काय संबंध आहे ? असावा ? या समस्येतूनच सर्व प्रकारचे तत्त्वचिंतन जन्मते ज्यामधून इतर तत्त्वज्ञाने व विज्ञानांचा उदय होतो.

पर्यावरण नीतिशास्त्र मुख्यत: या निसर्गाशी, पृथ्वीशी आणि विश्वाशी असलेल्या आपल्या संबंधाची आणि मूल्यात्मकतेची चर्चा करते. संक्षेपात मानव आणि निसर्ग यांचा नैतिक संबंध काय आहे, असा प्रश्न पर्यावरण नीतिशास्त्र विचारते.कोणत्याही प्रकारची पर्यावरण नीति या संदर्भाशीच येऊन थांबते. ही नीति मुख्यत: 5 समस्यांचा अभ्यास करते.ते पुढीलप्रमाणे :

## पर्यावरण नीतिशास्त्राचे मुख्य विषय

1. **विविध प्रकारचे प्रदूषण**
2. **नैसर्गिक साधनसंपत्तीचा दुरुपयोग**
3. **अतिरिक्त लोकसंख्या**
4. **प्राण्यांविषयी माणसाची अभिवृत्ती आणि माणूस त्यांना देत असलेली वागणूक.**
5. **विविध प्रकारच्या पर्यावरण प्रणालींचे स्वयंसिध्द मूल्य.**

या 5 समस्या पारंपरिक नीतिशास्त्रात नव्हत्या.त्या चा अभ्यास पारंपरिक नीतिशास्त्राच्या कक्षा रुंदावतो.सर्व प्रकारच्या नव्या मूल्य व्यवस्था यांत येतात.त्यापैकी आपण कोणत्या स्विकारल्या पाहिजेत,त्यांना कोणत्या नैतिक सिध्दांताचा आधार दिला पाहिजे किंवा कोणते नैतिक सिध्दांत नव्याने निर्माण केले पाहिजे,याचा ही कक्षा रूद करतो. हे समजावून घेण्यासाठी पर्यावरण नीतिशास्त्राचा उदय कसा झाला, हे पुढीलप्रमाणे :


## पर्यावरण नीतिशास्त्राचा उदय

पर्यावरणाचा विचार 20 व्या शतकाच्या प्रारंभीच सुरु झाला होता.मात्र त्याला वेग आला होता तो 1960 नंतरच.जीवनीतिशास्त्र आणि पर्यावरणीय नीतिशास्त्र या दोन्हींचा विचार 1960 च्या दशकात गांभीर्याने सुरु झाला.प्रारंभी ही दोन्ही क्षेत्रे परस्परांशी निगडीत होती. पर्यावरण नीतिचा अभ्यास सुरु झाला त्यावेळी ‘ पर्यावरणाचे नीतिशास्त्र ’ असे

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

शीर्षक त्या अभ्यासाला नव्हते.साधारणत: 1915 च्या दरम्यान अल्बर्ट श्वायत्झर या डॉक्टर विचारवंताने एक वेगळा नैतिक विचार मांडला. त्यास **'अस्तित्वविषयक / जीवनविषयक पूज्यभाव ' (The Reverence for Life)** असे म्हणतात.

**Albert Schweitzer**
(14 January 1875 – 4 September 1965)
a German and then French theologian, organist, philosopher, physician, and medical missionary. received the 1952 Nobel Peace Prize for his philosophy of "Reverence for Life"



मानवी जीवनाविषयीचा पूज्यभाव, श्रध्दा आपणास असतातच,एवढेच नव्हे तर न दिसणाऱ्या अज्ञात ईश्वराविषयी तर कमालीचा पूज्यभाव असतो.पण त्याच बरोबर आपण सृष्टीतील विविध प्रकारचे प्राणी, पक्षी, वनस्पती यांच्यविषयीही पूज्यभाव बाळगला पाहिजे,अशी मांडणी त्याने केली.हे विचार म्हणजे सर्व सजीव सृष्टीचे समर्थन करणारे पहिले नीतीशास्त्र होय. *Reverence for Life* हा वाक्यप्रयोग त्यांनीच वापरला. श्वायत्झर[1] म्हणतो '' खरे तत्वज्ञान हे जाणीवेविषयीच्या तात्काळ व व्यापक सत्यांच्या पासून सुरु झाले पाहिजे. नीती जीवनाविषयी आदर दाखविण्यात सामावलेली आहे. *The Reverence for Life* हे मुलभूत नीतीतत्व आहे. जीवन पवित्र मानले पाहिजे.'' "It is good to maintain and cherish Life, it is an ail to destroy and to check Life. That man is really ethical who is careful not to crush any insect as he walks. "

अल्बर्ट श्वायत्झर चा विचार हा पर्यावरणविषयक नीतिचा पहिला विचार होय. नंतर 1930-40 च्या दरम्यान अमेरिकन पर्यावरण तज्ञ आल्डो लिओपोल्ड याने *Sand Country Almanac* (1949) या पुस्तकात 'भूमिनीति ' (Land Ethics) या विषयाची मांडणी केली.



**Aldo Leopold** (January 11, 1887 – April 21, 1948)
an American author, scientist, ecologist, forester, and environmentalist

[1]अल्बर्ट श्वायत्झर यांच्या सारखाच दृष्टीकोन पॉल टेलर(**Paul W. Teller**) या आधुनिक अमेरिकन तत्वज्ञाने घेतला आहे. टेलर त्यांच्या ***Respect for Nature: A Theory of Environmental Ethics*** **(Princeton University Press, 1986)** या पुस्तकात म्हणतात की प्रत्येक सजीव प्राणी आपल्या स्वतःच्या पध्दतीने स्वतःचे कल्याण करुन घेण्याचा प्रयत्न करत असतो. आपल्या जीवनाला जे मूल्य आहे तसेच मूल्य सर्व जीवांना व त्याच्या जीवनाला असते, हे तत्व माणसाने लक्षात ठेवले पाहिजे.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

लिओपोल्डच्या मतें, केवळ काही सजीव, पशु-पक्षी व माणूस यांच्यापुरताच मूल्यविचार असता कामा नये, तर त्यात एकात्म, पृथ्वी आणि तिच्यावरची पर्यावरण प्रणाली यांचाही समावेश असला पाहिजे.

1960 च्या दशकात पर्यावरण नीतिने एकदम मोठी झेप घेतली. या काळात पर्यावरणीय प्रदूषण, नैसर्गिक साधन-संपत्तीचा गैरवापर, अतिरिक्त लोकसंख्या या नव्या विषयांचा समावेश झाला. ही सुरुवात पर्यावरण जागृती चळवळीची होती.हा श्री गणेशा *Rachel Carson* या विदुषीने लिहीलेल्या *Silent Spring* या पुस्तकाने झाला.डी.डी.टी. व इतर रासायनिक औषधांचा शेतीत वापर केल्यामुळे पिके व जमीन यांना कसा धोका पोहचतो, हे तिने स्पष्ट केले.विविध रसायनांमुळे पिके विषारी बनतात. जमीन निकस व ठिसूळ होते.एवढेच नव्हे तर पिके खाणारी पशु-पक्षी व माणसेसुध्दा नष्ट होऊ शकतात, असा इशारा तिने या पुस्तकात दिला.

**Rachel Louise Carson**
(May 27, 1907 – April 14, 1964)
an American marine biologist
and conservationist



हे पुस्तक या लेखिकेने श्वायत्झरलाचं अर्पण केलेले आहे. पर्यावरण चळवळीने या दशकामध्ये अतिशय चांगले रुप धारण केले. त्याचा परीणाम म्हणून 1970 पासून ' वसुंधरा दिन ' साजरा होऊ लागला. आणि सतत शोषणात मग्न असलेल्या अमेरिकेच्या एका सिनेटचे सदस्य गेलॉर्ड मेन्सन यांनी ' स्वच्छ व निरोगी पर्यावरण' हा अमेरिकनांचा जन्मसिध्द हक्क मानला जाण्याची तरतूद घटनेत करण्यात यावी , अशी मागणी केली.

1970 च्या दशकामध्ये जगभरात वसुंधरा दिनाच्या निमित्ताने विविध प्रकारच्या हरीत चळवळी सुरु केल्या नंतर केवळ वसुंधरेचेच संरक्षण नव्हे, तर भावी मानवी पिढीसाठी पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे, अशी भूमिका पुढे आली. त्याचाही समावेश पर्यावरण नीतित होऊ लागला. अशारितीने, पशु-पक्षी, वनस्पती, मानवी समाज आणि एकूणच सर्व प्रकारचे सजीव या सर्वांचा समावेश पर्यावरण नीतिशास्त्रात होऊ लागला. या सर्वांचा जोर वाढून 1979 साली अमेरिकेतून *Environmental Ethics* हे नियतकालीक प्रकाशित होऊ लागले. आणि नंतर पीटर सिंगर, अर्नी नेस,पॉल टेलर,लॉरेन्स जॉन्सन , रोलस्टन, फ्रेया मॅथ्यूज अशा अनेक लेखकांनी / तत्त्वज्ञांनी यांत सखोल चिंतन सुरु केले.

## नैतिकतेच्या कक्षा रुंदावल्या / व्यापक झाल्या.

पाश्चात्य नीति परंपरा मानवकेन्द्री गृहीतकावर आधारलेली आहे.' विश्वात सर्वोत्तम महत्वाची गोष्ट म्हणजे केवळ माणूसच ' ही मानवकेंद्री धारणा होय.हीला सर्व जगात धार्मिक आधारही मिळाला.' हे विश्व ईश्वराने केवळ माणसासाठी - आपला पुत्र / प्रतिकृती च्या सुखासाठी - निर्माण केले आहे ' अशी धारणा सर्व ईश्वरवादी धर्मांनी रुजविल्याने एकूण सर्वच चिंतन मानवकेंद्री (Anthropocentric) बनले. 20 व्या शतकापर्यंत कायम असलेले या गृहीततत्वामुळे नीति ही देखील मानवकेंद्रीतच असली पाहिजे,असा अट्टाहास बनला.त्याची सुरुवात प्रोटोगोरस (इ.स.पू.490 - 420 )या तत्त्वज्ञाच्या ***Man is the measure of all things*** या वचनापासून सुरु होते.

आधुनिक विज्ञानाचा जनक म्हणून ओळखला जाणाऱ्या लॉर्ड फ्रान्सिस बेकनने (1561-1626 ) ' विज्ञान ही निसर्गाविरुध्दची लढाई असून निसर्गाची सर्व रहस्ये मानवाने भेदलीच पाहिजेत' असे तत्त्वज्ञान मांडले.(आज अश्लील वाटेल अशी भाषाही तो या संदर्भात वापरतो.) इथूनच निसर्गाविरुध्द राजकारण सुरु झाले.पुरुष प्रधान संस्कृतीचे प्रतिमान

Department of Philosophy, Sangamner

वापरले जावून निसर्गाचे शोषण सुरु झाले.त्याची परिणती म्हणून ''नैतिक संबंध केवळ मानवालाच लागू असतात. कारण विचारशीलता, इच्छास्वातंत्र्य व कृतीस्वातंत्र्य या गोष्टी केवळ माणसातचं आहेत.माणूसच नीतिमान असतो.नीति माणसाची गुलाम आहे.मानवेतर प्राण्यात किंवा निसर्गात या गोष्टी नाहीत.निसर्गाचे चलनवलन काही नियमांनीच चालते. हेच नियम प्राण्यांना लागू आहेत.त्यामुळे नैतिकता ही गोष्ट त्यांना लागू होत नाही, '' अशी विचारसरणी आली.

मध्ययुगातीलच दुसरा महत्वाचा तत्त्वज्ञ रेने देकार्तने (1596-1650) शरीर व मन यांच्यात सुस्पष्ट विभागणी केली.त्यांच्यातील आंतरसंवाद मांडला.मन अथवा आत्मा केवळ माणसालाच असतो,असा बुध्दिवाद मांडला.देकार्तला ' आधुनिक तत्त्वज्ञानाचा जनक ' म्हणतात.पण त्याने प्राण्यांना मन नसते,प्राणी केवळ प्रजोत्पादन करणारी मांसल यंत्रे असतात,असा ही निष्कर्ष काढल्याने प्राणीहत्येचे नवेच हिंसक तत्त्वज्ञान जन्माला आले आणि प्राणीहत्या अधिकृत झाली.



अशारितीने प्राचीन काळापासून मध्ययुगीन बुध्दिवादामार्फत विसाव्या शतकापर्यंत '' माणूस हेच सर्व सुखाचे साध्य आहे. त्यामुळे साहजिकच निसर्ग व प्राणी माणसाच्या सुखाची साधने आहेत. माणसांना विवेक आहे, बुध्दी आहे. निसर्ग व प्राणी यांना ती नाही. आणि साधनांचा वापर कसा करावा, हे बुध्दिच्या साह्याने ठरवावयाचे असत '' अशी पारंपरिक नीती रचली गेली.तिला 20 व्या शतकात जबरदस्त धक्का बसला.कारण नव्या नीतित मानवासह सर्व सजीव,पृथ्वी व विश्वाचा समावेश झाला.

## 1. ईश्वर केंद्रवाद :

Theo म्हणजे ईश्वर किंवा धर्म किंवा नियंत्रक तत्त्व. म्हणून Theology म्हणजे ईश्वरशास्त्र किंवा धर्मशास्त्र. Theology असाही एक शब्द बनतो. त्याच अर्थ ईश्वरविषयक ज्ञान किंवा ईश्वरशास्त्र / धर्मशास्त्र असा होतो.Theology ही पाश्चात्य परंपरेतील संज्ञा आहे. धर्मशास्त्र ही खास भारतीय संज्ञा आहे. धर्मशास्त्राचे भाषांतर करणे कठीण आहे.तिचा सगळा अर्थ Theology मध्ये येऊ शकत नाही. त्यामुळे Theology या अर्थाने धर्मशास्त्र हा शब्द वापरता येत नाही.Theocentrism म्हणजे ईश्वरवाद ही संज्ञा सुध्दा त्यामुळे संस्कृत किंवा अन्य भाषेत परीणामकारकरित्या भाषांतर करता येत नाही. Theology व Philosophy या ख्रिश्चन कल्पना आहेत. Theology ची सुव्यवस्थित मांडणी संत थॉमस ॲक्वीनास या संत तत्त्ववेत्याने प्रथम केली.



**Thomas Aquinas**,
(1225 –7 March 1274)
an Italian Dominican priest
immensely influential
philosopher
and theologian
known as **Doctor Angelicus**, **Doctor Communis**, or **Doctor Universalis**

ॲक्वीनास जसा भक्तीमयी संत होता तसाच तो वैज्ञानिक दृष्टिकोनाचाही होता. या दोन्हींचा मिलाफ त्याच्या जगाविषयीचा ईश्वरकेंद्रीवादी सिध्दांतात आढळतो. त्याची ईश्वरविषयक व जगत विषयक कल्पना पुढीलप्रमाणे :

### ॲक्वीनासची ईश्वरविषयक व जगविषयक कल्पना :

ॲक्वीनसने बायबलच्या आधारे जगाविषयी ख्रिस्ती संकल्पना मांडली. हे जग ईश्वराने निर्माण केलेले असून तो सर्व शक्तीमान, सर्वज्ञ, दयाळू, अनंत, केवलसत. शुध्दस्वरुपाचा त्यामुळे हे जगसुध्दा त्याच्या स्वरुपाप्रमाणेच आहे. हे

जग आणि जगातील प्रत्येक जीव हा चैतन्यमय प्रभूचे लेकरु आहे. ईश्वर या जीव व जगताचे केवळ कारण नाही. तर तो अधिष्ठाान आहे. सर्व निसर्ग नियम व प्राणी जाती ' त्याच्या ' पासून निष्पन्न होते. तोच या ब्रम्हांडाचे अंतिम सत्य अशा ईश्वराचा साक्षात्कार हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय असले पाहिजे.ईश्वरनिर्मित सृष्टीचे पालन-पोषण व रक्षण करणे हे प्रत्येक माणसाचे काम आहे.अ‍ॅक्वीनास त्याच्या ईश्वरशास्त्राचे दोन भाग करतो .

**(1) नैसर्गिक ईश्वरशास्त्र.**

**(2) साक्षात्कारी ईश्वरशास्त्र.**

त्याच्या मते, ईश्वराची भक्ती करण्याची हे दोन मार्ग आहेत. श्रध्दा आणि बुध्दी या मार्गांनी ईश्वराकडे जाता येते. श्रध्देने पूजा, प्रार्थना, शरणागतता स्विकारली जाते. साक्षात्काराच्या मार्गाने प्रभूप्राप्ती होते. धर्म आणि संप्रदाय हा श्रध्देचा मार्ग आहे.

तर दुसरा मार्ग म्हणजे बुध्दिचा. बौध्दिक मार्गानेही ईश्वराकडे जाता येते, हे अ‍ॅक्वीनास दाखवून दिले. मानव समाज आणि निसर्ग यांची निर्मिती ईश्वरकृत आहे. बुध्दीच्या साह्याने या दोघांचा अभ्यास करुन प्रभूप्राप्ती होऊ शकते. समाज व निसर्ग यांची रचना, त्यांचे स्वरुप, त्यांची गुंता-गुंत, त्यांचा परस्पर संबंध समजावून घेणे म्हणजे त्यांचा परस्पर संबंध समजावून घेणे म्हणजे, त्यांचा अभ्यास करणे. जीव, भोतिक, भूगर्भ, खगोल, शरीर, वैद्यकिय इ. निसर्गशास्त्रांचा अभ्यास आपणांस निसर्गाचे स्वरुप ज्या अनेक रहस्यांगत उलगडून दाखविले हा अभ्यास जितका जास्त होईल, तितकी निसर्गाची अधिकाधिक रहस्य ज्ञात होतील. आणि निसर्ग जितका ज्ञात होईल तितका ईश्वर कळेल. कारण ईश्वर ही अतिशय दृढ, रम्य असे अंतिम तत्त्व.

थोडक्यात, निसर्गाचा अभ्यास म्हणजेच ईश्वराचा अभ्यास. ईश्वर स्वत:ला व्यक्तिरुपात प्रकट होण्याऐवजी तो विश्व आणि निसर्ग यांच्या रुपात प्रकट होऊ इच्छितो, होतो. अशारितीने हे विश्व व निसर्ग हा ईश्वराचं कलात्मक पणं गूढ रहस्यमय आविष्कार आहे.म्हणून या निसर्गाविषयी आपण श्रध्दा भाव, पूज्यभाव बाळगला पाहिजे. सर्व पशू-पक्षी व मानव हाही निसर्गाचा एक सेंद्रीय घटक आहे. या विश्वात पृथ्वी हाच एक सजीव ग्रह आहे. पृथ्वीवरील प्रत्येक जीव यांच्यात सेंद्रीय एकात्मता आहे. त्यामुळे पृथ्वीवर तिच्यावरील अस्तित्व टिकून राहिल असे आपण पाहिले पाहिजे. शोषण, हिंसा, अत्याचार या सगळया गोष्टी टाळून केवळ प्रेममय भावनेने या जगाकडे पाहिले पाहिजे. असे अ‍ॅक्वीनास म्हणतो.

अ‍ॅक्वीनासची ही दृष्टी पर्यावरण संरक्षणाला उपकारक आहे. अ‍ॅक्वीनासच्या भूमिकेशी जुळणारी भूमिका प्राचीन ग्रीक विचारवंत प्लॉटिनस, प्लेटो आणि अ‍ॅरिस्टॉटल यांनी केलेली आढळते. त्याचे प्रतिबिंब ख्रिश्चन तत्त्वज्ञानात आढळलेले दिसते. बायबलच्या मते, ईश्वराने माणसासाठी हे जग निर्माण केले. ही ईश्वराची निर्मिती असल्याने तिचे रक्षण व संवर्धन हे माणसाची जबाबदारी आहे.

हिंदू तत्त्वज्ञानाचे ज्ञान असा जगाविषयीचा ईश्वरकेंद्री विचार आढळतो. अर्थात, तो पुराण वाङमयात आणि धार्मिक वाङमयात प्रकर्षाने जाणवतो. वेदांताने या जगाचे अस्तित्वच नकारले आहे. पण न्यायदर्शनाने व इतर काही दर्शनाने ते स्विकारले आहे. तर 12 व्या शतकात वेदांत सांगणाऱ्या ज्ञानेश्वरांनी मात्र हे जग म्हणजे ब्रह्याच्याच विलास आहे,असा जगत्विलासवाद मांडला. नंतरच्या संत तत्त्वज्ञानात जगाविषयी हा ईश्वरकेंद्रवाद आढळतो.

## 2. मानवकेंद्रवाद *(Anthropocentrism)* :

Anthrop म्हणजे विकसित माणूस. Anthropology म्हणजे मानव वंश शास्त्र हे शास्त्र गेल्या शतकात विकसित झाले. तथापि विश्वाविषयीचा मानवकेंद्रीवाद प्राचीन काळापासून मांडण्यात आलेला आहे.मानवकेंद्रवाद म्हणजे मानवेतर प्राण्यांना वगळून व केवळ मानव हाच केंद्र आहे, असे मानून ज्ञानाची रचना करणे हा वाद केवळ मानवी मूल्ये महत्त्वाची मानतो. म्हणून मानवकेंद्रवाद म्हणजे मानव हाच विश्वाचा केंद्रबिंदू आहे,असे सांगणारा वाद.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

---

उपयोजित नीतिशास्त्रात या संज्ञेचा उपयोग मानवी कल्याण साधणाऱ्या विविध प्रकारच्या कृती, अभिवृत्ती व मूल्ये यांचे वर्णन करणारा या अर्थाने येतो. हे कल्याण निसर्गातील पशुपक्षी व संपूर्ण पर्यावरण ही सुखाची साधने ओत. असे समजून केली जाते. यपर्यावरण नीतिच्या संदर्भात मानव केंद्रवादाबाबत 4 मुद्दे आहेत, ते पुढीलप्रमाणे :

1) मानवतावादाचे पारंपरिक समर्थन.त्या वरील टिका / चिकित्सा.
2) मानवतावादास पर्याय.
3) मानवतावाद विरुध्द अमानवीयता.



## पारंपरिक मानवकेंद्रवाद

नीति ही केवळ मानवी कल्याणासाठी असते. तो फक्त मानवी व्यवहार आहे. नैतिक समाज केवळ माणसांचा असतो. त्यात मानवेतर पशु-पक्षांचा समावेश होऊ शकत नाही, असे समजतो. कारण आत्मा, बुध्दीमत्ता आणि भाषा या तीन गोष्टी माणसांमध्ये प्राण्यांपेक्षा अधिक व उच्च दर्जाच्या आहे. असे मानवतावाद मानतो. त्यामुळे मानवी कल्याण्यासाठी व सुखासाठीच मानवेतर पशु-पक्षी आणि निसर्ग यांचा वापर झाला पाहिजे.

पाश्चात्य विचारांमध्ये असा मानवतावाद प्राचीन काळापासून आहे. प्लेटो, ॲरिस्टॉटल, प्लॉटिनस ते ॲक्वीनास पर्यंत अनेक पाश्चात्य विचावंतांनी मानव केंद्रवाद मांडला. ग्रीक व पाश्चात्य विचारात या संदर्भात अस्तित्वाची भव्य शृंखला मांडण्यात आला आहे. यानुसार ईश्वराने सर्व पशु पक्षांची रचना उतरत्या श्रेणीने केली आहे. परीपूर्णता ईश्वरापासून वनस्पतीपर्यंत उतरत्या श्रेणीची आहे. आधी स्वत: ईश्वर देवदूत - प्रतिकृती म्हणून माणूस - प्राणी - वनस्पती असा हा क्रम आहे जो. जास्त परिपूर्ण असेल तो खालच्यांवर राज्य गाजवेल. अशीही देवदत्त रचना आहे. तीच नीती होय. प्राण्यांना नसलेला आत्मा माणसांना असतो. माणूस हा ईश्वराची प्रतिकृती आहे, ख्रिश्चन व ईस्लाम या धर्माच्या मते, ईश्वराने तर माणूसच श्रेष्ठ आहे. जगाची निर्मिती मानवी सुखासाठीच झालेली आहे. आत्मा हे वेगळे वैषिष्टय केवळ माणसालाचं ईश्वराने दिलेले आहे.

ईश्वराने माणसाला आत्मा दिला तशी बुध्दीही दिली. बुध्दीमत्ता हा केवळ माणसाचा गुणधर्म असून बुध्दीच्या जोरावर त्याने या जगावर अधिराज्य गाजविले आहे. संस्कृती निर्माण केली आहे.बुध्दी हेच माणसाचे सामर्थ्य आहे.माणसाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे भाषा हे आहे. बुध्दीचा अविष्कार होण्यासाठी संकल्पना मांडाव्या लागतात. संकल्पना भाषेशिवाय शक्य होऊ शकत नाही. भाषा ही जणूकाही दैवी देणगी आहे. डेकार्त, कांट यांच्या मते, संकल्पनसा भाषेतूनच मांडाव्या लागतात. आणि ही क्षमता फक्त माणसातच आहे.

अशा रितीने आत्मा, बुध्दी व भाषा ही मानवी वैशिष्टये असल्याचे पारंपरीक मानवतावाद सांगतो. म्हणून नीतिची, मूल्य व्यवस्थेची रचना मानव केंद्रीच असली पाहिजे. माणूस हाच विश्वाचा केंद्रबिंदू असून तोच साध्य आहे तर इतर जग त्याचे साधन आहे. प्रोटागोरास हा तत्त्वज्ञ म्हणतो. *Man is the measure of all things* ते ह्यासाठीच. ही कल्पना विविध प्रकारच्या बौध्दिक क्षमता आणि धारणा स्पष्ट करते सगळे जग फक्त माणसांसाठीच आहे. असे सांगते. माणूस विचार कसा करतो हे त्याचे उत्तम उदाहरण होय. म्हणूनच शेक्सपीयरचा हॅम्लेट म्हणतो की, या जगात चांगले किंवा वाईट असे काहीही नसते. पण आपला विचार त्याला तसे बनवितो.


वरील कारणांमुळे मानव केंद्रवाद स्विकारावा असा आग्रह केला जातो. नव्हे तो आपण स्विकारला पाहिजे. तो न स्विकारणे ही चूक ठरेल. तत्त्वत: व व्यवहारात सुध्दा नीतिचा वाहक म्हणून केवळ माणूसच असू शकतो, इतर प्राणी असू शकत नाही. असे मानवतावाद सांगतो. शिवाय निसर्ग व निसर्गातील घटकांचा जीवनक्रम पाहता एक जीव दुसऱ्यासाठी जगतो, असेच आढळते. मांजरीने खाल्ले म्हणून उंदीर जसे मांजरीवर टीका करु शकत नाही तसे माणसाने खाल्ले म्हणून माणसावर टीका करु नये. कारण माणूस श्रेष्ठ आहे.

Department Of Philosophy Sangamner College Sangamner

## मानवकेंद्रवादाची चिकित्सा

मानवतावाद माणसाचे गुणगान गात असला व कितीही समर्थनीय असला तरी त्यात अडचणी आहेत. मुळात ही पृथ्वी ईश्वराने माणसाला आंदण दिली हे गृहीततत्त्वच चुकीचे आहे. उदा. बौध्द, जैन व हिंदू हे धर्म व त्यांचे तत्त्वज्ञान मानवतावादाचा वरील दावा फेटाळून लावते. इतर पशू पक्षांनाही माणसाचा सारखाचं जगण्याचा अधिकार आहे. प्रत्येक जीव इतरांशी सुसंवाद राखू जगू शकतो अशी मांडणी केली जाते. उलट प्राण्यांमध्ये नसलेली विचारशक्ती माणसाकडे असल्याने माणसाची जबाबदारी जास्त आहे. माणसाने हे ओळखले पाहिजे की, पशुपक्षी व निसर्ग हे त्याच्या अस्तित्वाचाच भाग आहे, असे हे तीनही धर्म सांगतात. या तीन भारतीय संप्रदायाचा प्रभाव गेल्या शतकात अमेरिकेसारख्या मदांध देशावर पडून काही अमेरिकांनी पृथ्वी हाच एकमेव सजीव ग्रह असून त्याचे रक्षण केले आहे. असा विचार मांडला. त्यासाठीच 1980 च्या दशकापासून वसुंधरा दिन साजरा करण्यात येऊ लागला.

मानवकेंद्री गृहीत तत्त्वांना आधुनिक विज्ञानाने आव्हाने दिली आहे. उलट अस्तित्वाची भव्य शृखला चुकीची व गैर समजावर आधारलेली असल्याचे 18 व्या शतकात *Linakeus* या विषशास्त्रज्ञाने आणि 19 व्या शतकात चार्ल्स डार्विन याने सिध्द केले. डार्विनच्या मते, सजीवांमधील नैसर्गिक निवडीची प्रक्रिया ही काही इतर प्राण्यांना नष्ट करुन स्वत: जीवंत राहण्यासाठी होत नसते. इतर प्राण्यांच्या तुलनेत स्वत: काहीतरी चांगले निर्माण व्हावे, म्हणून काही मानवी प्रगती निर्माण होत असते. मानववंशशास्त्र आणि सामाजिक विज्ञानांमधील काही शोधांनी असे दाखविले आहे की, बुध्दी, भाषा आणि सामाजिक नाती ही केवळ माणसांमध्येच नसून इतर प्राण्यांमध्येही आढळतात. प्रत्येक पशु पक्ष्यांच्या जातीला स्वत:ची एक सांकेतिक भाषा असते. हत्ती हा सर्वात बुध्दीमान तर चिपांझी हा सामाजिक नाती असलेला प्राणी आहे. हे प्राणी सुध्दा त्यामुळे काही नैतिक धारणा मार्ग अवलंबितात.



**Carl Linnaeus**
(23 May 1707 – 10 January 1778)
a Swedish botanist, physician,
and zoologist,
laid the foundations for the modern
scheme ofbinomial nomenclature.
known as the father of modern taxonomy,
and considered one of the fathers of
modern ecology.

अशारितीने मानवतावाद हा अत्यंत संकुचित असून तो केवळ मानव स्वार्थ वाद आहे. शिवाय तो अशास्त्रीय आणि अनैसर्गिकही आहे. अशी टिका त्यावर करण्यात येते. त्यामुळे त्यास पर्याय सुचविण्यात आला आहे. तो पुढीलप्रमाणे :

## मानवतावादास पर्याय

मानवतावादावर वरीलप्रमाणे आक्षेप घेतलेले हा वाद स्वार्थी आणि इतर सजीव सृष्टीला केवळ साधन समजत असल्याने तो स्विकारणे योग्य नाही, असे माणण्यात आले. मानव केंद्रवाद हा फक्त मानवी हितसंबंधच जपणारा आहे. असे लक्षात आल्यामुळे तो नाकारण्यात आला किंवा त्यात सुधारणा करण्यात आली ती पुढीलप्रमाणे :

मानवतावादास पर्याय देता येतो. केवळ हितसंबंध जपण्यापेक्षा मानवी हितसंबंधाचे सुव्यवस्थित पुर्नमुल्यांकन करावे व या हितसंबंधात सर्व सजिव सृष्टीचा समावेश करावा असा विचार मांडण्यात आला. प्राण्यांही सुख-दुखाच्या भावना असतात. त्यामुळे त्यांचा नैतिक विचार होऊ शकतो. माणसाचे हित विविध प्रकारच्या पर्यावरण प्रणालींचे रक्षण, सजीवांचे रक्षण व संबर्धन ंतसुध्दा आहे. माणसाचे भावजीवन, त्याचे विविध प्रकारचे सांस्कृतिक अविष्कार या सजिव

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---



पर्यावरण प्रणालींशी निगडीत आहे. असे मुद्दे मांडण्यात आले. आणि पर्यायी मानवतावादाची मांडणी करण्यात आली. यांत तीन मुद्द्यांचा समावेश होतो.

1) प्रत्येक सजीवाचे मूल्य.
2) मूल्यवान अस्तित्व
3) पर्यावरण प्रणालींचे मूल्य

प्रत्येक सजीवास सुख दुखाच्या भावना आहेत. त्याला आनंद दु:ख अनुभवता येतात. म्हणून जरी प्राणी स्वत: कोणतीही नीति व्यवस्था विकसित करु शकले नाहीत. तरीही मानवी व्यवस्थेत त्यांना स्थान देता येते. प्रत्येक सजीवास हे स्वयंमूल्य आहे. सजीवांचे जीवन मानवी जीवनाप्रमाणे मानसशास्त्रीय, भावनीक व सामाजिक असते. याचाच अर्थ त्यांना मूल्य आहे.

हे मूल्य केवळ सजीवांना आहे असे नव्हे तर वनस्पतीना आहे. वनस्पती श्वासोश्वास करतात. त्यांना वाढ आहे. ते स्वावलंबी आहे. पुर्ननिर्मिती क्षम आहे आणि त्यांना मानवी भावनांना प्रतिसाद देता येतो. हा सिध्दांत भारतीय वनस्पतीशास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस आणि अलीकडे रॉबिट ॲटफिल यांनी मांडला. वनस्पती या एकूण अस्तित्वाचा भाग आहे. त्यांना मूल्य देणे, म्हणजे श्वायत्झर म्हणतो तसे अस्तित्वाविषयी पूज्यभाव बाळगणे.



**Sir Jagadish Chandra Bose**
(30 November 1858 – 23 November 1937)
a Indian polymath:
a physicist, biologist, botanist, archaeologist,
as well as an early writer of science fiction.
pioneered the investigation
of radio and microwave optics, and laid the
foundations of experimental science in
the Indian subcontinent

आता केवळ वनस्पतींमध्ये तर निर्जीव वस्तूंना सुध्दा आपण नैतिक वागणूक दिली पाहिजे. दगड-धोंडे, पर्वत, नदया, ओढे, विविध प्रकारचे ऋतू आणि सर्वच प्रकारच्या नैसर्गिक घटना या सर्वांनांच एक नैतिक मूल्य आहे. ते मानवी वास्तत्वाविषयीची व मानवी भावविश्वाची रचना कणार घटक आहे. या संदर्भात आलो लिओ पोल्डची पर्यावरणनीती महत्वाची आहे.

## ( 2 ) प्राण्यांचे हक्क

समतेचे तत्त्व हा एक मूलभूत अधिकार म्हणून मान्य करण्यात आलेला आहे. जात, धर्म, लिंग, समृध्दी, शिक्षण इ. प्रकारच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा विविध बाजूंनी विचार करणे सर्व प्रकारचे भेद मान्य करुनही अखिल मानव जातीत समता हे मूल्य स्विकारले गेलेले आहे ते नीतीतत्त्व म्हणून सर्व माणसांसाठी सर्वत्र स्विकारले गेले.

20 व्या शतकाच्या उत्तरार्धात समतेचे हे तत्व म्हणजे विविध माणसांच्या परस्पर हीतसंबंधांचे तत्त्व आहे आणि ह्या हीत संबंधांमुळेच माणसे एकमेकांना समान मानतात. अशी मांडणी 1980 नंतरच्या दशकात पिटर सिंगर[2] या गौरवर्णीय तत्त्वेत्याने केली.


सिंगर समतेचे हे तत्त्व नीतीच्या कक्षा रुंदावून प्राण्यांसाठीही लागू करु इच्छितो. समतेचे तत्त्व केवळ माणसांना नव्हे तर मानव बाह्य प्रजातींना सुध्दा लागू करता येईल. असा त्यांचा दावा आहे. अर्थात प्राणी माणसांना समान आहे. असे त्यास म्हणावयाचे आहे. माणूस ज्या अर्थाने परस्परांशी समतेने वागतो त्याअर्थाने प्राणी परस्परांशी समान आहे. असे नव्हे

---

[2] 1946 साली जन्मलेला हा तत्त्वज्ञ आज जिवंत आहे.सर्व तत्त्वज्ञ काही मेलेले नसतात ! तो काही वर्षांपूर्वी पुण्यातही येवून गेला

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

तर माणूस आणि प्राणी हे परस्परांचे हीतसंबंध राखण्यासाठी समान आहे. आणि ही समता मुख्यत: प्राण्यांच्या जगण्याच्या हक्काबद्दलची आहे. पीटरच्या मते, प्राणी आपल्यापेक्षा कमी दर्जाचे आहे किंवा कमी बुध्दीवान किंवा कमी शक्तीवान आहे. म्हणून त्यांचे शोषण करता येईल हा नैतिक युक्तीवाद होऊ शकत नाही. कारण मानव समुहातच लहान मुले किंवा मतीमंद हे आपल्यापेक्षा दुर्बल असूनही आपण त्यांना समान मानतो हाच नियम प्राण्यांना लागू करावा असे सिंगरचे मत आहे.



**Peter Albert David Singer**
(born 6 July 1946)
is an Australian philosopher .
Ira W. DeCamp Professor Of Bioethics at Princeton University and Laureate Professor at the Centre for Applied Philosophy and Public Ethics at the University of Melbourne.
Specializes a secular, preference utilitarian perspective.



समतेचे तत्त्व माणसांपलीकडे जाऊन प्राण्यांना ही लागू करता येते हे प्रथम जेरेमी बेंथॉम या उपयुक्ततावादी तत्त्वज्ञाने ओळखले. असे सिंगर लक्षात आणून देतात. बेंथॅमने जो समतेचा मुद्दा आफ्रिकेतील वर्णयुध्दाच्या संदर्भात उपस्थित केला होता, कृष्णवर्णीय आफ्रिकन जनतेला सुध्दा जगण्याचा हक्क आहे असे प्रतिपादन समतेच्या आधारे बेंथॅमने केले, दु:खवेदन किंवा संवेदनांची जाणीव ही सर्व माणसांना असते, असे बेंथम म्हणतो. इतर कोणत्याही क्षमतांपेक्षा, दु:खाची वेदना हीच जास्त महत्वाची आहे. त्यामुळे कृष्णवर्णीयही माणसे असून त्यांना माणसांसारखे वागवले पाहिजे. हा बेथॅमचा दावा सिंगर प्राण्यांसाठीही लागू करतो.

प्राण्यांना दु:ख होते की नाही ? याचे उत्तर ' होते ' , असेच द्यावे लागते. जर माणूस म्हणून मला दु:ख होत असेल तर माझ्यासारखाच सजीव प्राणी म्हणून प्राण्यांनाही दु:ख होत असणार म्हणता येते. दु:खा प्रमाणेच प्राण्यांना माणसांप्रमाणे सुखाचीही जाणीव होते. सुखद दु:खद संवेदनांच्या बाबतीत प्राणी माणसांसारखे समान आहे, असे सिंगर म्हणतो हाच मुद्दा उचलून तो मानवी हक्कांप्रमाणे प्राणी हक्कांना जोडतो.

प्राण्यांना हक्क असतात. ते कोणते ? तर प्राण्यांना मुख्यत : जगण्याचा हक्क आहे. माणूस मूलभूत हक्क आणि मानवी हक्क अशी भाषा करतो. तीच भाषा प्राण्यांच्या संदर्भात आपण केलेली पाहिजे असा त्याचा दावा आहे. या संदर्भात तो दोन वाद सांगतो.

1) वंशवाद
2) प्राणीवाद

वंशवाद उघडच मानवी वंशाला महत्व देतो आणि प्राणीवाद हा स्वत:च्या जाती सदस्यांना महत्व देतो. जेव्हा दोन प्राणी जमातीत अंतरंगात कलह होतो त्यावेळी प्राणीवाद दिसून येतो. स्वजातीय प्राण्यांना महत्व देतो. तो प्राणीवाद मानवी प्राणीवाद हा फक्त स्वत:च्याच दु:खाची काळजी करतो. प्राण्यांच्या दु:खाची काळजी करत नाही. तथापि हाच मुद्दा आणखी विस्तृत करुन प्राण्यांच्या संदर्भात सर्व माणसांना लागू करता येईल. व प्राण्यांना हक्क असतात. असे म्हणता येईल, असे सिंगर म्हणतो. माणसाला जसा जगण्याचा हक्क आहे, तसा प्राण्यांनाही हक्क आहे. आहे. आणि मुख्यत: जगण्याचा हक्क आहे. याचा अर्थ असा नव्हे की, प्राण्यांनी कर्तव्यदेखील करावे कारण जेव्हा मानवी हक्कांची भाषा येते तेव्हा हक्कांबरोबरच कर्तव्याचीही भाषा येते. हक्क बजावणे म्हणजे कर्तव्य करणे व कर्तव्य करणे म्हणजे इतरांच्या हक्काची रक्षा करणे असा तार्कीक आणि नैतिक संबंध हक्क आणि कर्तव्य यांच्या बाबत लावण्यात येतो. तथापि असा

Department of Philosophy, Sangamner College

संबंध प्राण्यांच्या बाबतीत लागू करता येणार नाही, असे सिंगरचे उदामतवादी मत आहे. कारण माणूस बुध्दमान असून तो कर्तव्यांची जाणी व बाळगू शकतो, तशी बुध्दीमत्ता प्राण्यांकडे नसल्याने प्राणी कर्तव्य करु शकत नाही. दु:ख व सुख संवेदनांच्या बाबतीत माणूस व प्राणी दोघांनाही जगण्याचा अधिकार आहे. पण कर्तव्याची जबाबदारी फक्त माणसांची आहे. दिवसभर खाने, पिणे, विश्रांती झाल्यानंतर रात्री कुत्र्याने चोरांवर भुंकण्याचे कर्तव्य केले पाहिजे असे म्हणता येणार नाही. कारण अनोळखी माणसांमधून चोर ओळखण्याची क्षमता कुत्र्याने विकसीत केलेली नसते. तो फक्त अनोळखी माणसांवर भुंकत असतो. त्यामुळे प्राण्यांना हक्क असतात, पण कर्तव्य नसतात. प्राणी हक्काच्या संदर्भात चर्चा पुढे नेतांना सिंगर त्यांच्यावर होणाऱ्या प्रयोगांबद्दलही टिका करतो. ती पुढीलप्रमाणे :



## सिंगरचे मत : शाकाहारवाद

हा धक्का प्रामुख्याने सिंगरने सुरु केलेल्या विविध प्रकारच्या चळवळींनी झाला. सिंगरने प्राणी मुक्ती आंदोलन चळचळ सुरु केली. 1973 साली *Animal Liberation* या प्रदीर्घ लेखात सिंगर म्हणतो की,' कोणतीही मुक्ती चळवळ आपल्यालाकडे नैतिकतेची क्षितीजे व्यापक करण्याची मागणी करते. त्यामुळे आजपर्यंत जे वर्तन, ज्या रुढी आणि जे संबंध नैसर्गिक व अढळ वाटत होते तेच आता अनैतिक आणि अक्षम्य वाटू लागले.' सिंगरच्या मते, नैतिकतेची कक्षा वाढविणे, ही या विश्वाशी व सजीव-निर्जीवाशी असलेले आपले नाते अधिक सौहार्दपूर्ण व मित्रत्वाचे करणारे ठरेल.त्यामुळे संकुचित नीतिनुसार जे नैतिक होते, तेच व्यापक नीतिनुसार तेच व्यापक नीतिनुसार अनैतिक बनते.पारंपरीक नीति, प्राणी- वनस्पती व निसर्ग यांना नीतिच्या चर्चाविश्वातून वगळते.पण व्यापक नीतित या सगळयांचा समावेश होतो आणि त्या सर्वांशी असलेले आपले वर्तन नैतिक किंवा अनैतिक ठरते.

पारंपरिक नीतिच्या मते, प्राणी विचारशील नाहीत त्यामुळे त्यांना नैतिकता लागू होत नाही. पण सिंगरच्या मते, विचारशीलता हा प्रश्नच प्राण्यांच्या संदर्भात गैर लागू आहे.तर प्राण्यांना दु:खाची वेदना असते की नाही ? हा एकच प्रश्न त्यांना नैतिकता बहाल करतो.त्यांना दु:ख संवेदना असते. त्यामुळे त्यांच्या दु:खाचा विचार करणे व ते दु:ख मानवी दु:खासारखेच आहे, असे मानणे आवश्यक आहे. म्हणून मानवाला दु:ख देणे जसे अनैतिक आहे तसे प्राण्यांना दु:,ख देणे हे अनैतिक आहे. हे मान्य केले पाहिजे.

माणसाना दुसऱ्याचे दु:ख प्रत्यक्ष (अनुभवाने) कळत नाही. ते त्यांच्या बाहय वर्तनावरुन कळते की, त्यांना दु:ख / वेदना होते आहे.माणूस व मानवेतर प्राणी यांच्यातील वर्तन पुष्कळसे सारखे असते. फक्त प्राण्यांना बोलता येत नाही. परंतु बालकांनाही बोलता येत नाही , पण त्यांना वेदना होतात,ही गोष्ट आपण का विसरतो ? आपण हेही लक्षात ठेवले पाहिजे की सर्व पृष्ठवंशीय प्रांण्याची मज्जासंस्था मुलत: सारखी असते. (विशेषत: पक्षी व स्वस्तन प्राणी) वेदनेशी संबधीत असे माणसाच्या मज्जसंस्थेचे भाग फार प्राचीन आहेत. (उत्क्रांती दृष्टीने) मानवी मेंदूचा काही भाग (Cerebral Cortex) मानव इतर संस्तन प्रांण्यापासून वेगळया प्रकारे उत्क्रांत होत गेला त्याच्याही संबधित आहे पण मुलभुत भावनांबाबत (सुख, दु:ख इ.) आपण प्राण्यांशी पुष्कळ साधर्म्य राखून आहोत, असा सिंगरचा युक्तिवाद आहे.अशारितीने विचारशीलता या नीतिच्या निकषाऐवजी ' दु:खाची संवेदना' निकष स्विकारुन सिंगर नीतिची कक्षा रुंदावली.

## टॉम रिगनचे मत

टॉम रिगन या तत्वज्ञाने नैतिक तत्त्वज्ञानातील हक्क ही संकल्पना त्याने ती सर्व सजीव, प्राणी सृष्टीसाठी उपयोगात आणली. त्याचे म्हणणे असे की, ''आपल्याला काही हक्क आहेत,ते ही विशेष हक्क आहेत,आपले जीवन साध्य आहे.ते कोणत्याही साधनाने साधलेच पाहिजे,'' असा बडेजाव माणूस आणतो.पण माणसाला जगण्याचा हक्क आहे. तसा तो सर्व प्राण्यांना आहे की नाही ? तर आहेच ! शिवाय तो नैसर्गिक हक्क आहे. त्यांचे जीवन त्यांच्या दृष्टीकोनातून साध्यच आहे, असे तो म्हणतो.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



**Tom Regan**
(born November 28, 1938)
an American philosopher
specializes in animal rights theory.
professor emeritus of philosophy
at North Carolina State University,
Regan is the author of numerous
books on the philosophy of animal
rights, including
*The Case for Animal Rights*,



प्राण्यांना हक्कांची जाणीव नसली तरी जीव म्हणून जगण्याचा,वंशविस्तार करण्याचा त्यांचा हक्क जन्मसिध्द आहे.या जैवप्रणालीत त्यांना विशिष्ट स्थान आहे, याचे भान माणसानेच ठेवले पाहिजे.उलट ते त्याचे ते कर्तव्य बनते.त्याच्यावरील ती नैतिक बंधकता आहे. थोडक्यात हक्क व साध्यमूल्य या दोन संकल्पना प्राण्यांच्या संदर्भातही उपयुक्त आहेत, अशी मांडणी करुन रिगन नीतिची कक्षा वाढवितो.

## सखोल पर्यावरणवाद विरध्द उथळ पर्यावरणवाद - आर्नी नेसचे मत :

अर्नी नेस हा नॉर्वेजीयन तत्त्वज्ञाचा सिध्दांत म्हणजे 'सखोल पर्यावरण नीति' (Deep Ecology) होय. गेल्या काही दशकात ''पर्यावरणशास्त्र'' या नावाचे शास्त्र विकसीत झाले. जीवसृष्टी व तिचा पर्यावरणाशी असलेला संबंध यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे पर्यावरण शास्त्र होय.हे शास्त्र पर्यावरणाच्या विविध घटकांचा त्यांच्या संबंधांचा वैज्ञानिक प्रगतीच्या होणाऱ्या परीणामांचा अभ्यास करते. हा अभ्यास शास्त्र ( as the science ) म्हणून होतो. पण पर्यावरण समतोल राखण्यासाठी माणसाने कोणती जीवनशैली स्विकारावी, कोणती मुल्ये अंगीकारावी, ही सगळी नैतिक जबाबदारी पर्यावरण शास्त्र झटकते. म्हणून या शास्त्रास नेस 'उथळ पर्यावरणशास्त्र'' असे म्हणतो.

आता, पर्यावरणाच्या समतोलाचा विचार करणारे, समतोल राखण्यासाठी लागणारे कोणती नीतितत्त्वे, जीवनशैली स्विकाराव्यात, याचा विचार करणे म्हणजे पर्यावरण नीति पाळणे होय. ही नीति निसर्गाविषयी, पर्यावरणाविषयी माणसाने कोणती नैतिक भूमिका घ्यावी हे स्पष्ट करते. निसर्ग हा माणसाच्या अस्तित्वाचा मुलभूत गाभा आहे.पर्यावरणाच्या संतुलनास खरेखुरे 'स्वंयभू आत्ममूल्य' आहे.त्यामुळे तो जपणे, अनिवार्य आहे, याची जाणीव पर्यावरण नीति देते. हा सखोल विचार असल्याने या पर्यावरण नीतिला नेस ''सखोल पर्यावरण नीती '' असे म्हणतो.

1984 साली अर्नी नेस आणि जॉर्ज सेशन यांनी खऱ्या पर्यावरण चळवळीची तत्त्वे मांडली.ते जणू पर्यावरणाचे नीतीशास्त्र म्हंटले पाहिजे.त्यातील प्रमुख तत्त्वे पुढीलप्रमाणे :

(1) पृथ्वीवरील मानवी व मानवेर जीवनाची वाढ आणि त्यांचे कल्याण यांना स्वतंत्र स्वतोमूल्य आहे.मानवेतर विश्वाची मानवाला असलेली केवळ उपभोग्य उपयुक्तता लक्षात घेणे,अनैतिक आहे.विश्वाची संपूर्ण रचना केवळ मानवाच्या सुखाचे साधन म्हणून नाही.पृथ्ववरील एकंदर जीवनाचे (The Life / The Existence) उपयुक्तता निरपेक्ष मूल्यही लक्षात घेतले पाहिजे.

(2) या मूल्यांच्या अमलबजावणीसाठी सर्व जीवनाकारांची (The Life Forms) समृध्दी व विविधता आवश्यक आहे.

(3) जैविक क्षेत्र (biosphere) ही शब्दप्रयोग व्यापक व गंभीर असून त्यात नद्या,वने,उपवने, जीवसृष्टी व पर्यावरणप्रणालींचा समावेश होतो.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

(4) विश्वात जैवकेंद्री समतावाद *(biocentric egalitrianism)* आहे.सर्व जीव प्रतिष्ठा व दर्जा म्हणून समान आहेत.प्रत्येकाला जगण्याचा , फुलण्याचा हक्क आहे.प्रत्येक जीव संपूर्ण जीवनाचाच (The Life) अवियोज्य हिस्सा आहे.(हा समतावाद बिल डेवाल आणि जॉर्ज सेशन यांनी मांडला.)

(5) जीवनावश्यक गरजा भागविण्याखेरिज माणसाला पृथ्वीवरील समृध्दी व विविधता कोणत्याही मार्गाने कमी करण्याचा , त्यांची उधळपट्टी करण्याचा अधिकार नाही.

सखोल पर्यावरणास मूल्यात्मकता देण्यासाठी कालांतराने संपुर्णतावाद (Wholism) मांडण्यात आला.लॉरेन्स जॉन्सन यांनी त्यांच्या *A Morally Deep World* या पुस्तकात तो स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते कोणतीही जाती / वंश (species ) हा केवळ त्या जातीच्या सदस्यांचा समूह नसतो ; तर ती स्वत:च एक विशिष्ट प्रकारचे स्वतंत्र अस्तित्व असते. (an entity in it's own right) ते स्वत:च एक ' संपूर्ण ' असते.त्यामुळेच विशिष्ट जीवाच्या व्यक्तिगत आस्था (interests) व समूहाचा सदस्य म्हणून असणाऱ्या त्याच जीवाच्या आस्था वेगवेगळ्या आहेत, ही बाब नैतिक चिंतनात अनिवार्य भाग म्हणून लक्षात घेतल्या पाहिज़ेत.

## प्राण्यांवरील प्रयोगाबद्दल नैतिक समस्या

मानवी जीवन अधिक सुरक्षित व्हावे, सर्व प्रकारच्या रोगांना प्रतिकार करण्याची शक्ती त्यात असावी, म्हणून वैज्ञानिक व वैद्यकीय विज्ञाने प्रयत्न करीत असतात. त्यासाठी ते प्रयोग करतात. गेल्या काही दशकात विज्ञानावरील बहुतेक क्षेत्रात विलक्षण क्रांती झाली. आणि जीवशास्त्र, रसायनशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, सौंदर्य प्रसाधनशास्त्र यांत नवनवे शोध लागले. त्यांना आधुनिक जैव तंत्रज्ञानाची जोड मिळाली आणि प्राण्यांचा उपयोग या सर्व गोष्टींसाठी होऊ लागला. प्राण्यांवरील प्रयोग मुख्यत: दोन कारणांसाठी झाला.

1) प्राण्यांचा अन्न म्हणून उपयोग 2) सौंदर्य प्रसाधने

विविध प्रकारची औषधे, आहाराची तंत्र यांच्या संबंधात विशेष करुन प्राण्यांना वापरले गेले हे सर्व प्रयोग मानवी आनंदासाठी करणे आवश्यक आहे, असा दावा करण्यात आला तो पिटस सिंगर खोडून काढतो.त्याच्या मते, कोणत्याही नैतिक भूमिकेतून प्राण्यांवर कोणतेही वैज्ञानिक, वैद्यकीय किंवा सौंदर्य उत्पादने यांच्यासाठी प्रयोग करणे अनौतिक आहे, हे तो पुढील प्रमाणे मांडतो.:

मानवी सुख व आनंद यांच्यासाठी प्राण्यांचा उपयोग मुख्यत: अन्न म्हणून करणची पध्दती अत्यंत प्राचीन आहे. प्राण्यांना अन्न म्हणून वापरणे ही ऐशा-आरामी बाब आहे. ज्या प्रकारची जीवन पध्दती जगातील माणसे जगतात त्यात त्यांना मांसाहार अनावश्यक आहे. उत्तर ध्रुवावरील बर्फाळ प्रदेशात राहणाऱ्या एस्किमो सारख्या जातींना टिकून राहण्यासाठी मांसाहार करणे योग्य असेल तथापी आपल्यापैकी बरेच जण उपयोग प्रधान समाजात राहत असल्याने व शेती पिकवित असल्याने मांसाहार टाळणे उचीत व नैतिक ठरेल असे सिंगर म्हणतो. प्रगत औद्यागिक देशातील स्त्री-पुरुषांची वाढती वजने हेच दर्शवितात की चांगले आरोग्य किंवा दीर्घायुषीपणा यांच्यासाठी मांसाहाराची गरज नाही. अगदी वैद्यकीय दृष्टीकोनातून पाहताना सुध्दा शाकाहारातून मिळणारे उष्मांक आपणांस पुरेसे असतांना आपण अनावश्यकरित्या प्राणी हत्या करुन अतिरिक्त उष्मांक मिळवितो. जे आपणास धोकादायक आहे.

माणसाने प्राण्यांचा उपयोग आहारासाठी करण्याचा नैतिक प्रश्न मुख्यत: प्रगत समजल्या जाणाऱ्या औद्योगिक समाजातच जास्त असते. विशेषत: मांस स्वस्त पडावे म्हणून डूकरांसारख्या प्राण्यांना पाश्चात्य राष्ट्रे अतिशय वाईट पध्दतीने जगावयास लावतात. मांसाहार स्वस्त व्हावा यासाठी अयोग्य, रोगट वातावरणात प्राण्यांची पैदास करणे हे अनैतिक आहे. प्राण्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन मांस देणारी यंत्रे असे केले आहे. प्राणीवाद थांबविण्यासाठी या गोष्टी थांबविल्या पाहिजे.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

केवळ मांसाहार नव्हे तर सौंदर्य प्रसाधने व औषधे यांच्या निर्मितीसाठी सुध्दा प्राण्यांवर प्रयोग केले जातात. त्यांची हत्या केली जाते. प्राण्यांची चरबी, दात, त्यांचे विविध अवयव यांची कुंटी विविध प्रकारच्या सौंदर्य प्रसाधनामध्ये वापली जाते. तसेच नव्या औषधांचा शोध लावल्यानंतर त्यांचे परीणाम पाहण्यासाठी प्राण्यांवर प्रयोग केले जातात. औषध कंपन्या, नवे शांपू, नेल मलम यांचा वापर करण्यापूर्वी प्राण्यांवर प्रयोग करुन पाहतात. उदा. आयलायनर पासून काही होते की काय ? हे पाहण्यासाठी ही लायनर प्रथम सशांच्या डोळयांवर वापरली गेली, त्यात अनेक ससे आंधळे झाले. औषधांप्रमाणेच विविध अन्नपदार्थातील पूरक कृत्रिमरंग, प्रतीरक्षके या सगळयांचा प्रयोग प्राण्यांवर केला जाते. त्यामुळे प्राणी खूप आजारी प्डून मरण पावतात. व त्यानंतर त्यांना बेवारस फेकून देण्यात येते.त्यामुळे हे प्रयोग किंवा वेगवेगळया सोंदर्य प्रसाधनावरील किंवा औषधांवरील चाचण्या करणे हे अनैतिक आहे शिवाय या चाचण्या व प्रयोग माणसांचे आजार कमी करणाऱ्या नाहीतच आणि जरी या उत्पादनांच्या सुरक्षेसाठी त्या आवश्यक असल्या तरी आपल्याकडे मुळातच भरपूर औषधे, सौंदर्य प्रसाधने इ. उपलब्ध असल्याने या प्रयोगांची गरज नाही.

प्राण्यांवर प्रयोग करणे योग्यचं आहे, असा दावा करणाऱ्यांच्या मते, प्राणी आपल्यापेक्षा दुर्बल असतात. ते दुय्यम जीव आहे त्यांना विचारशक्ती नाही त्यामुळे ते संस्कृती निर्मिती करु शकत नाही. शिवाय ते माणसांच्या उपयोगासाठीच आहेत. अगदी फारच झाले तर ही सजीव यंत्रे म्हणता येईल म्हणून प्रयोगासाठी व अन्न म्हणून त्यांना वापरणे योग्य आहे.

तथापि, सिंगरच्या मते जरी प्राणी दुय्यम, दुर्बल असल; त्यांना विचारशक्ती नसली तरी त्यांना खाणे किंवा मानवी स्वार्थासाठी वापरणे हे अनैतिक आहे कारण मुळात त्यांना जगण्याचा हक्क आहे. तसेच त्यांना सुख, दु:खाची जाणीव होते. विशेषत: दु:खाची त्यांना तीव्र संवेदना होते. शिवाय आपल्याप्रमाणे प्राणी सुध्दा निसर्गाची निर्मिती आहे. समजा त्यांच्या दुय्यम असण्यामुळे त्यांना वापरावे असे म्हणणेसुध्दा चुकीचे आहे. कारण माणसांमध्ये सुध्दा दुर्बल, बेवारस अशी माणसे असतात. कैदी, मतीमंद असतात. लहान-मुले असतात. मग त्यांच्यावर प्रयोग का करु नये ? माणसांवर प्रयोग करणे अनैतिक ठरते. कारण ती माणसे आहेत हा युक्तीवाद लंगडा आहे. प्राणी सजीवयंत्रे नाहीत. असे सांगून सिंगर म्हणतो की, प्राणी आपल्याप्रमाणेच सुख दु:खांनी, भावना व्यक्त करणारे जीव आहेत.

पण समजा हजारो माणसांचे जीव वाचावेत म्हणून एखादया प्राण्यावर प्रयोग केल्यावर काय बिघडते ? तर सिंगरच्या मते, हा केवळ काल्पनिक प्रश्न आहे कारण अशा प्रयोगांमधून नकली निष्कर्ष सुध्दा मिळू शकतो. शिवाय उपयुक्ततावादयांच्या दृष्टिकोनातून विचार केला तर एक काय पण शेकडो प्राण्यांवर सुध्दा प्रयोग करण्यास हरकत नाही पण उपयुक्ततावाद नेहमीच उपयुक्त असतो असे नाही आणि प्राण्यांवर प्रयोग करुन मेंदूतील रक्तस्त्राव, रक्तक्षय, हृदयविकार, यकृताचे आजार असे गंभीर रोग, आजार दुरुस्त होण्यावर उपाय सापडत असेल तर मग तुम्ही बेवारसच माणसे प्रयोगात का वापरत नाहीत ? असा प्रतिप्रश्न करुन सिंगर म्हणतो की, कट्टर नैतिक भूमिका घेतल्यास कोणत्याही सजीव प्राण्यावर कसलेही घातक प्रयोग करणे अनैतिकच आहे. माणसाने मुळात आपल्या नीतिच्या कक्षा रुंदावल्या नाहीत तर त्याला जगणे कठीण होईल हे लक्षात घेतले पाहिजे. नीती केवळ मानवी न ठेवता ती परीवार निती ठेवली पाहिजे. अशी शिफारस सिंगर करतो.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner